## संक्षिप्त



### पनवेलमध्ये उभारणार आधुनिक 'पिंक टॉयलेट्स'

**खांदा कॉलनी :** महिलांना सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित आणि सुविधायुक्त स्वच्छतागृहे उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने आधुनिक 'पिंक टॉयलेट्स' उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे. पहिल्या टप्प्यात सीकेटी महाविद्यालयाजवळील मँगो गार्डन, कळंबोलीतील के. एल. ई. कॉलेज आणि खारघरमधील हिरानंदानी बसथांबा येथे प्रायोगिक तत्त्वावर ही सुविधा उभारण्यात येणार आहे. पुढील टप्प्यात गर्दीच्या २५ ते ५० ठिकाणांची निवड केली जाणार आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी या प्रकल्पाचा आराखडा सादर केला आहे. या स्वच्छतागृहांमध्ये सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन, वापरलेल्या नॅपकिनसाठी इन्सिनरेटर, स्तनपानासाठी हिरकणी कक्ष, सीसीटीव्ही, पॅनिक बटण आणि महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांची सुविधा प्रस्तावित आहे.

### संगमेश्वरचे डायलिसिस सेंटर पुन्हा झाले सुरू

**खांदा कॉलनी :** संगमेश्वर येथील डायलिसिस सेंटर पुन्हा सुरू झाले असून काही काळ खंडित झालेली डायलिसिस सेवा पूर्ववत सुरू झाल्याने तालुक्यातील मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार किरण सामंत यांनी यासाठी पुढाकार घेतल्याने सेंटर पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला. स्थानिक पातळीवरच डायलिसिसची सुविधा उपलब्ध झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमधून समाधान व्यक्त होत आहे. संगमेश्वर तालुक्यातील डायलिसिसची गरज असलेल्या रुग्णांसाठी हे सेंटर महत्त्वाचे आहे. नियमित डायलिसिस करावे लागणाऱ्या रुग्णांना आठवड्यातून अनेकवेळा उपचार घ्यावे लागतात. यासाठी रत्नागिरी किंवा अन्य ठिकाणी जावे लागत असल्याने प्रवासाचा खर्च, वेळ व रुग्णांच्या प्रकृतीवरील ताण वाढत होता. काही काळ सेंटरची सेवा खंडित झाल्याने रुग्णांची मोठी गैरसोय झाली होती. या पार्श्वभूमीवर आमदार किरण सामंत यांनी सेंटरची सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे डायलिसिस सेंटर पुन्हा कार्यान्वित झाले असून रुग्णांना पूर्वीप्रमाणे स्थानिक पातळीवर उपचार घेणे शक्य झाले आहे.

### मंडणगडमध्ये कारच्या धडकेत तिघे गंभीर जखमी

**मंडणगड :** मंडणगड तालुक्यातील पुनवली येथील सांडगेवाडी ते शेणळे सईणारा मार्गावर कारने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने तिघे जण गंभीर जखमी झाले. हा अपघात ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडला. याप्रकरणी कारचालक आशुतोष अशोक पंढरपूरकर (५४, रा. कोथरूड, पुणे) याच्याविरुद्ध मंडणगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजु नबीसाब मुल्ला (५२, रा. पालेघर, मंडणगड) हे मोटारसायकल (एमएच १२ एस ५२४७) घेऊन जात असताना आरोपी आशुतोष पंढरपूरकर याने आपल्या ताब्यातील कार (एमएच ०८ बीसी ७३५७) भरधाव व निष्काळजीपणे चालवून मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात राजु मुल्ला यांच्यासह देवकुमार मेघेपाल खैरनार (२७, मध्य प्रदेश) आणि जैमुद्दीन अनू शेख (४२, मुंबई) हे तिघे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी मेहबूब नबीसाब मुल्ला (४९, रा. पालेघर, मंडणगड) यांनी १२ नोव्हेंबर रोजी मंडणगड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

### भेलसईतील दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**खेड :** तालुक्यातील भेलसई खांबेवाडी येथील वळणावर दुचाकीवरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. रविंद्र भागुराम तांबे (वय २६, रा. भेलसई बौद्धवाडी, ता. खेड) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्र तांबे हा आपल्या ताब्यातील होंडा शाईन मोटारसायकल (क्रमांक एमएच ०८ एडब्ल्यू ६५६१) घेऊन गावातील हर्षद तांबे याला पाठीमागे बसवून भेलसई येथून खेडीकडे जात होता. दरम्यान, भेलसई खांबेवाडी येथील वळणावर त्याच्या ताब्यातील दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या रवींद्र याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

# ट्रकची बसला धडक, चौघे गंभीर, 16 जखमी

## आराम बस १०० फूट गेली फरफटत, अंजणारी घाट ठरतोय डेंजरझोन

**लांजा : पुढारी वृत्तसेवा**

मालवाहू ट्रकची खासगी आराम बसला मागून जोरदार धडक बसून घडलेल्या भीषण अपघातात २० प्रवासी जखमी झाल्याची घटना मुंबई-गोवा महामार्गावरील अंजणारी येथे काजळी नदी पुलावर शुक्रवार दि. ९३ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान घडली. यात चौघे गंभीर तर १६ प्रवासी किरकोळ जखमी झाले.

आराम बस विरार येथून मालवणच्या दिशेने निघाली होती तर मालवाहू ट्रक राजस्थानवरून गोव्याच्या दिशेने निघाला होता. ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रकने आराम बसला दोनवेळा जबर धडक दिली. त्यामुळे आराम बस महामार्गावर कलंडली व १०० फूट फरफटत जाऊन संरक्षक भिंतीवर जाऊन धडकली. बसला धडक बसताच प्रवाशांच्या थरकाप उडाला. संरक्षक भिंतीमुळे बस अडली अन्यथा नदीपात्रात कोसळली असती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

अपघातात नयन कुलकर (१०, विरार), प्रकाश धावडे (५४, कणकवली), प्रांजल राऊत (९, मुंबई), रुत्वी पारकर (१०, मुंबई), यशवी पारकर (५४, मुंबई), आराध्या पारकर (३८, मुंबई), सुधा सावंत (२८, देवगड), अश्विनी वालम (२०,मुंबई), विश्वास राऊत (५५, मुंबई), विनिता राऊत (५२, मुंबई), सूर्यकांत जडवी (रा. मुंबई) या प्रवाशांसह ट्रक चालक दिलावर सुमार खान (३६, राजस्थान) अशा १२ प्रवाशांसह अन्य ८ जण जखमी झाले. या अपघाताबाबत माहिती अशी की, श्री स्वामी कृपा नावाची खासगी आराम बस (क्र. एम. एच. ४८, डिसी-९४३९) विरार येथून गुरुवारी दुपारी ३.३० वाजता प्रवासी घेऊन मालवण येथे जाण्यास निघाली. आराम बस हृषीकेश जोशी (२४, विरार पूर्व) व त्याचा सहकारी चालक कुणाल कांबळे (२६, विरार पूर्व) हे दोघे बदलीने चालवत होते. आराम बस मुंबई-गोवा महामार्गाने जात असताना बस लांजा तालुक्यातील अंजणारी येथील काजळी नदी पुलानजीक शुक्रवारी पहाटे ३.४५ च्या दरम्यान आली असता याचदरम्यान राजस्थान ते गोव्याच्या दिशेने सोळा चाकी ट्रक (क्र. आरजे- १९, जिजे- ४७८६) हा महेंद्र कंपनीच्या वाहनांचे बॉडीपार्टस व मार्बल्स असे अवजड साहित्य घेऊन गोव्याच्या दिशेने निघाला होता. अंजणारी घाटाच्या तीव्र उतारावर आराम बस आली असता, बस मागे भरधाव असणाऱ्या ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पुढे असणाऱ्या आराम बसला मागून जोरदार दोनवेळा धडक दिली. ट्रकची धडक एवढी जबर होती की, आराम बस महामार्गाच्या मार्गिकेवरून १०० फूट फरफटत गेली.



### बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना सुखरूप काढले बाहेर

बस महामार्गावरून फरफट जाताच प्रवाशांचा थरकाप उडाला व प्रवाशांनी बचावासाठी आरडाओरडा केला. आराम बस काजळी नदीपात्रावर बांधलेल्या संरक्षक भिंतीला जाऊन धडकली तर ट्रक महामार्गाच्या एका बाजूला जाऊन कलंडला. अपघात घडताच महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनांनी थांबून आराम बसमध्ये अडकून पडलेल्या प्रवाशांना मदतकार्य करून त्यांना बाहेर काढले. अपघातात गंभीर जखमी विश्वास राऊत, विनिता राऊत, सूर्यकांत जडवी या तीन प्रवाशांसह ट्रक चालक दिलावर खान यांना जिल्हा रुग्णालय येथे हलविण्यात आले.अपघाताची माहिती मिळताच हातखंबा वाहतूक मदत केंद्र आणि लांजा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी रत्नागिरी एमआयडीसी अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण करण्यात आले होते. अग्निशमन दलाच्या जवान व पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करून बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले.

# मार्लेश्वर तीर्थक्षेत्री डोंगरावरून दगड पडून बालिकेचा मृत्यू; दोघे जखमी

**देवरुख : पुढारी वृत्तसेवा**

मार्लेश्वर तीर्थक्षेत्रात डोंगरावरून दगड पडून ६ वर्षीय बालिकेचा मृत्यू होण्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. या घटनेत दोघेजण जखमी झाले. ऋत्वीच्या मृत्यूने इस्लामपूर येथील पाटील कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

इस्लामपूर येथील कापूसखेड येथील पाटील कुटुंबामधील ऋत्वी संदीप पाटील (६) हिच्या डोक्यावर दगड पडून मृत्यू झाला. पाटील कुटुंब हे मार्लेश्वर व गणपतीपुळे येथे दर्शनासाठी आले होते. कुटुंबामधील ८ जणांचा हा समूह सकाळी इस्लामपूर येथून मार्लेश्वर दर्शनासाठी आला होता. मार्लेश्वर देवस्थानचे दर्शन घेऊन धारेश्वर धबधब्याकडे सर्व मंडळी गेली होती. सर्व कुटुंबातील सदस्यांनी नदीतील पाण्यात हात-पाय धुतले. तसेच लहान मुलांनी आंघोळ करण्याची मजा घेतली. यानंतर ही सर्व मंडळी परतीसाठी निघत होती. नदी पार करून देवस्थान क्षेत्राकडे परतत असतानाच दुपारी १२ च्या सुमारास अचानक डोंगरावरून तीन दगड खाली पडले.



यातील एक दगड ऋत्वीच्या डोक्यावर पडला. यात ऋत्वी जखमी झाली. डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तप्रवाह झाला. एक दगड ऋत्वीचे वडील संदीप यांच्या पायावर पडला. यात ते देखील जखमी झाले. तिसरा दगड ऋत्वीचे काका यांच्या हाताला व तोंडाला लागून पडला. यात ते देखील जखमी झाले. ऋत्वीला पुढील उपचारासाठी देवरुख ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले.तपासणी करण्यात आली असता वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप माने यांनी ती मृत असल्याचे घोषित केले.

# सुट्टीत दापोलीच्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची झुंबड!

**दापोली : प्रवीण शिंदे**

दिवाळीच्या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी दापोली तालुक्यातील निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची अक्षरशः झुंबड उडाली आहे. तालुक्यातील विविध पर्यटनस्थळे, समुद्रकिनारे पर्यटकांनी गजबजून गेले असून मोठ्या संख्येने पर्यटक दापोलीत दाखल झाले आहेत. समुद्राच्या लाटांचा आनंद, निसर्गरम्य परिसर व कोकणातील अस्सल खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांची विशेष पसंती दापोलीला मिळत आहे. दापोलीच्या पर्यटनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे येथील समुद्रकिनारे आणि ताजी मासळी. हर्णे, मुरुड, कर्दे, लाडघर यांसारख्या किनाऱ्यांवर पर्यटकांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. समुद्रकिनाऱ्यावर फिरणे, लाटांमध्ये खेळणे, छायाचित्रे काढणे आणि कुटुंबीयांसोबत निवांत वेळ घालवणे यामध्ये पर्यटक रमले आहेत. विशेष म्हणजे पर्यटकांना येथील ताज्या मासळीच्या चवीची विशेष भुरळ आहे.



**हर्णे : बंदरावरील मासळी लिलावात ताजी मासळी खरेदी करताना पर्यटक. (छाया : गजानन तोडणकर)**

# आरेवारे समुद्रकिनारी झिपलाईनवर जोडपे अडकले

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रत्नागिरीतील प्रसिद्ध आरेवारे समुद्रकिनारी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या एका तरुण जोडप्याला झिपलाईनच्या साहसी खेळादरम्यान थरारक अनुभवाला सामोरे जावे लागले. झिपलाईनवरून समुद्राच्या दिशेने प्रवास करत असताना अचानक दोघेही समुद्राच्या मध्यभागी हवेतच अडकून पडले. खाली अथांग समुद्र आणि वर हवेत लटकलेल्या अवस्थेमुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अखेर स्थानिक नागरिक आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत दुसऱ्या रस्सीच्या सहाय्याने दोघांनाही सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणले. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. आरेवारे समुद्र किनाऱ्यालगतच्या उंच कड्यावरून थेट समुद्रकिनाऱ्याच्या दिशेने झिपलाईनची साहसी सुविधा सुरू करण्यात आली आहे. गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास झिपलाईनच्या माध्यमातून प्रवास सुरू केलेले एक तरुण जोडपे समुद्राच्या वर मध्यभागी पोहोचताच अचानक पुढे जाणे थांबले.



**आरेवारे : येथील झिपलाईनवर अडकून पडलेले जोडपे.**


Prime Focus

**प्राइम फोकस लिमिटेड**

**सीआयएन :** L92100MH1997PLC108981
**नोंदणीकृत कार्यालय :** प्राइम फोकस हाऊस, सिटी बँकेसमोर, लिंकिंग रोड, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२.
**दूरध्वनी :** +९१ २२ २६४८ ४९००
**ई-मेल :** ir.india@primefocus.com **वेबसाइट :** www.primefocus.com

**दि. ३०.०९.२०२६ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा (स्थायी व एकत्रित) अहवाल**

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ (''**सेबी सूची विनियमन**'') चे विनियमन ३३ यांच्या अनुपालनांतर्गत, दि. ३०.०९.२०२६ रोजी संपलेली दुसरी तिमाही व सहामाहीकरिताच्या कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांना (स्थायी व एकत्रित) प्राइम फोकस लिमिटेडच्या (''**कंपनी**'') संचालक मंडळाद्वारे त्यांच्या **शुक्रवार, दि. १३.११.२०२६** रोजी आयोजित त्यांच्या सभेमध्ये मंजुरी देण्यात आली आहे.

मर्यादित पुनरावलोकन अहवालासमवेत सदर वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाइट https://www.primefocus.com/wp-content/uploads/2026/11/Final_Results_with_Notes_signed.pdf वर तसेच स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स www.bseindia.com व www.nseindia.com वरही उपलब्ध असून क्यूआर कोड स्कॅन करूनहीते प्राप्त करता येऊ शकतील.

दिनांक : १३.११.२०२६
ठिकाण : मुंबई

**प्राइम फोकस लिमिटेड करिता**
**सही/-**
**नरेश मल्होत्रा**
**अध्यक्ष व पूर्ण वेळ संचालक**
**डीआयएन: ०००००४५९७**

**टीप :** वरील माहिती ही सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४७ अंतर्गत आहे.



**जाहीर सूचना**

**"उज्ज्वल स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट"** चे विश्वस्त, ट्रस्टच्या मालकीच्या मालमत्तेची "जशी आहे, जिथे आहे" या तत्त्वावर विक्री करण्यासाठी सीलबंद लिफाफ्यात लेखी प्रस्ताव आमंत्रित करत आहेत. ही मालमत्ता खालीलप्रमाणे आहे: "फुलवाडी रोड, तालुका भचाऊ, जिल्हा कच्छ, राज्य गुजरात ३७०१४० येथील अंतिम भूखंड क्र. १९७, क्षेत्रफळ ४३७.७६ चौ. मी., टी.पी. योजना क्र. ०१, सिटी सर्व्हे क्र. २४६, सिटी सर्व्हे वॉर्ड क्र. ५".

प्रस्ताव, ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ट्रस्टच्या वकिलांच्या "ॲड. योगेश सिंग, जी/१२, ग्राऊंड फ्लोअर, रिझवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई ४०० ०५४" या पत्त्यावर येथे पोहोचणे आवश्यक आहे. या करारात वेळेचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे; त्यामुळे ३० दिवसांनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

ट्रस्टच्या मालमत्तेची विक्री करण्याबाबतच्या अटी व शर्तींची प्रत, वरील पत्त्यावर, १४ नोव्हेंबर २०२६ ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत कोणत्याही कामकाजाच्या दिवशी, दुपारी ३:०० ते संध्याकाळी ५:०० या वेळेत १०,०००/- रुपये शुल्क भरून मिळवता येईल. ट्रस्टकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १३ डिसेंबर २०२६ आहे. प्रस्ताव देणाऱ्यांनी ट्रस्टने निश्चित केलेल्या अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

ज्या व्यक्तींना बोली लावायची आहे, त्यांनी आपल्या प्रस्ताव पत्रासोबत "उज्ज्वल स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट" च्या नावे काढलेला 'डिमांड ड्राफ्ट' किंवा 'पे ऑर्डर' जोडणे आवश्यक आहे. ही रक्कम प्रस्तावातील एकूण किमतीच्या १०% इतकी असावी. जर प्रस्ताव स्वीकारला गेला नाही, तर भरलेली रक्कम व्याजाशिवाय परत केली जाईल. मात्र, एकदा प्रस्ताव स्वीकारल्यानंतर, जर प्रस्ताव देणाऱ्या व्यक्तीने कोणत्याही कारणास्तव माघार घेण्याचा निर्णय घेतला, तर भरलेली अनामत रक्कम परत केली जाणार नाही; त्यामुळे प्रस्ताव देणाऱ्यांनी 'खरेदीदाराने सावध राहावे' या तत्त्वाचे पालन करावे. सदर मालमत्तेची विक्री ही महाराष्ट्र राज्याचे माननीय धर्मादाय आयुक्त यांच्या मंजुरीच्या अधीन असेल.

प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक १५ डिसेंबर, २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता, वर नमूद केलेल्या पत्त्यावर उघडले जातील. यावेळी प्रस्ताव देणाऱ्या व्यक्ती उपस्थित राहू शकतात. अटी असलेले प्रस्ताव, 'पे-ऑर्डर' नसलेले प्रस्ताव किंवा अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, प्रस्ताव स्वीकारण्याचा, नाकारण्याचा किंवा त्यामध्ये बदल करून स्वीकारण्याचा अधिकार ट्रस्टकडे राखीव आहे.

**दिनांक : १४ नोव्हेंबर, २०२६**
**ठिकाण : मुंबई.**

**उज्ज्वल स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट**
**सही/-**
**(विश्वस्त)**


# कोकणचा सुपुत्र संतोष गांगण यांचा दुसऱ्यांदा जागतिक हवामान परिषदेत डंका

## इकोसेन्सिटिव्ह गावांसाठी आंतरराष्ट्रीय निधी, शेतकऱ्यांसाठी कार्बन क्रेडिटवर भर

**राजापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोकणचे सुपुत्र आणि भारतीय जनता पक्षाचे नेते संतोष शांताराम गांगण यांना सलग दुसऱ्या वर्षी संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक हवामान बदल परिषदेत (COP) भारताच्या शिष्टमंडळातून सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. गतवर्षी ब्राझील येथे झालेल्या COP30 नंतर यावर्षी तुर्कीतील अंताल्या येथे सुरू असलेल्या COP31 परिषदेत ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पर्यावरण संरक्षण गतिविधी टीममधून भारताचे प्रतिनिधित्व करत आहेत.

या जागतिक व्यासपीठावर भारतीय संस्कृती आणि पर्यावरण यांच्यातील अतूट नाते तसेच 'हरित भारत' ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्यावर भारतीय शिष्टमंडळाचा भर आहे. अल निनोसारख्या हवामानविषयक घटनांचा प्रभाव, अनियमित पर्जन्यमान, वाढते तापमान आणि दुष्काळ यांसारखी आव्हाने भारतासह महाराष्ट्रातील शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम करत आहेत. हवामान बदलाचे हे संकट भारताने गांभीर्याने घेतले असून, त्यावर मात करण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे. भारताची ही भूमिका संतोष गांगण आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडत आहेत. मात्र संतोष गांगण यांनी या सहभागातून कोकणच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधी मिळवण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.कोकणातील अनेक गावे इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये येत असल्याने विकासकामांवर मर्यादा येतात. पर्यावरणाचे संरक्षण करतानाच स्थानिकांना रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

### कार्बन क्रेडिटमधून शेतकऱ्यांना उत्पन्नाची नवी संधी

पर्यावरणपूरक शेती, वृक्षसंवर्धन आणि कृषिवन शेतीच्या माध्यमातून कार्बन क्रेडिट मिळवून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवता येऊ शकते. ही संकल्पना कोकणातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संस्थांचे सहकार्य व तांत्रिक मार्गदर्शन मिळवण्याचे प्रयत्न संतोष गांगण करत आहेत.पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकास यांची सांगड घालून कोकणातील गावांना जागतिक योजनांशी जोडणे, स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवणे आणि शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध करून देणे, हा त्यांच्या सहभागामागील प्रमुख उद्देश आहे.जागतिक स्तरावरील संधींचा उपयोग कोकणच्या मातीच्या विकासासाठी करण्याच्या उद्देशाने संतोष गांगण यांचे प्रयत्न सुरू आहेत.

# प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्यांना आणखी एक संधी

## गणना प्रपत्र भरून सादर करण्याचे आवाहन

**मुंब्रा : पुढारी वृत्तसेवा**

विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) २०२६ अंतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या मतदारांना भारत निवडणूक आयोगाने आणखी एक संधी दिली आहे. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार (ASDD) या प्रवर्गात नावे समाविष्ट झालेल्या मतदारांना आवश्यक कागदपत्रांसह गणना प्रपत्र भरून संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे सादर करता येणार आहे.

प्रारूप यादीत नाव नसलेल्या मतदारांची मतदान केंद्रनिहाय यादी संभाव्य कारणांसह मतदान केंद्रे, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. बीएलओमार्फतही मतदारांपर्यंत प्रपत्र पोहोचवले जाणार असून, आयोगाच्या संकेतस्थळावरून किंवा ॲपवरून जुन्या ईपीआयसी क्रमांकाद्वारे ते डाउनलोड करता येईल.



स्थान न बदललेल्या मतदारांनी स्वाक्षरी केलेले गणना प्रपत्र आणि परिशिष्ट-ब, तर राज्यांतर्गत स्थलांतर केलेल्या मतदारांनी नवीन पत्त्याच्या पुराव्यासह प्रपत्र आणि परिशिष्ट-क सादर करणे आवश्यक आहे. बेघर व्यक्तींसाठी बीएलओचा स्थळ पाहणी अहवाल रहिवासी पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे. प्राप्त प्रपत्रांची पडताळणी करून पात्र मतदारांचा अंतिम यादीत समावेश केला जाणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.


**पश्चिम रेल्वे**

**पाडकाम आणि स्वच्छता काम**

चीफ वर्कशॉप मॅनेजर, कॅरेज रिपेअर वर्कशॉप, पश्चिम रेल्वे, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ९३
**निविदा क्र.: डब्ल्यूआर-पीएल-एमई-ईएसटी-६९७४४८वी दिनांक: १२.११.२०२६ कामाचे नाव: कॅरेज रिपेअर वर्कशॉप, लोअर परेल येथे व्हील सेट ॲक्सल बॉक्स असेंब्लीचे पाडकाम आणि स्वच्छता. कामाची किंमत:** ₹४८,४०,९६४/- **ईएमडी:** ₹९६,८००/- **ई-निविदा ऑनलाइन सादर करण्याची आणि उघडण्याची अंतिम तारीख आणि वेळ: ३०.११.२०२६ रोजी १५.०० वाजता.** अधिक तपशीलांसाठी कृपया आमच्या वेबसाइटला भेट द्या: www.ireps.gov.in 0809

आम्हाला फॉलो करा : X.com/WesternRly



**Bhiwandi-Nizampur City Municipal Corporation**
**Solid Waste Management**
**E-Tender Notice**

Online bids are invited for following Work. Tender forms may be purchased online by the Bidder, having relevant experience.

| S.No. | Particulars | Details |
|---|---|---|
| 1. | Name of the Employer | BHIWANDI CITY MUNICIPAL CORPORATION |
| 2. | Name of Work | Appointment of an Agency to Conduct Various Activities of Capacity Building Activities (CB) Under Swachh Bharat Mission 2.0 in BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION for a Period of One Year. |
| 3. | Earnest Money Deposit (EMD) | **Rs.2,00,000/-(Rupees Two Lakhs only)** in the form of FDR/BG issued from Nationalized/Scheduled Bank of India or can transfer in the form of DD in Favor of BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION **Mode of Payment - Online only or DD** |
| 4. | Proposal validity | 90 days from the last date of submission of bid |
| 5. | Mode of submission of the bid | Online |
| 6. | Downloading bid documents from | http://gem.gov.in |
| 7. | Schedule of bidding process | Sr.No. / Event Description / Date and Time: a) Sell of bid/TENDER document — 13/11/2026 11:43 Hrs to 25/11/2026 12: Hrs; b) Opening of the Bid Document — 26/11/2026 12:00 Hrs |
| 8. | The Employer's representative is: | BHIWANDI-NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION |
| | E-mail: | healthheadquarter@gmail.com |
| 9. | Project Duration | One year which can be extended on satisfactory performance |
| 10. | Method of Selection | **Quality and Cost Based Selection (QCBS).** |
| 11. | Undertaking the work | Within 7 days from the date of Agreement |
| 12. | Currency | Bidders must express the price of work in India Rupees (₹). |
| 13. | Taxes | The bidder has to quote the financial including all taxes and GST |

**Note:**
The bidder shall have to submit their bids online and upload the relevant documents from as per key schedule (Key details)
1. Tender Document and other details shall be available on: - Website- http://gem.gov.in/
2. Earnest money to be submit by DD only
3. Amendment to Notice Inviting Tender, if any would be published on website http://gem.gov.in

**Sd/-**
**Assistant Municipal Commissioner**
**Solid Waste Management**
**Bhiwandi-Nizampur City Municipal Corporation**


# ठाण्यात कोकण महोत्सवात जलसंपत्ती जपण्याचा जागर

## शेतकरी, दशावतारी कलावंतांना मिळणार हक्काचे व्यासपीठ, बाल्यानाचही महोत्सवात

**वागळे : पुढारी वृत्तसेवा**

कोकणातील ग्रामीण उत्पादक शेतकरी, पारंपरिक कला आणि दशावतारी कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याबरोबरच कोकणच्या आर्थिक आणि शाश्वत विकासाचा संदेश देण्यासाठी ठाण्यात सहा दिवसांच्या कोकण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना स्वातंत्र्यवीर सावरकर नगर, सिंधुदुर्ग सामाजिक मंडळ ठाणे आणि शिवसेनेचे माजी गटनेते तथा नगरसेवक दिलीप बारटक्के यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ते २० नोव्हेंबरदरम्यान हा महोत्सव रंगणार आहे.



वागळे इस्टेटमधील स्वातंत्र्यवीर सावरकर नगर येथील ठाणे महापालिका शाळा क्रमांक १२० च्या पटांगणात दररोज सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत महोत्सव होईल. 'भगवा घेऊन खांद्यावर, शिवसैनिक दिसेल बांधावर!' आणि 'दुष्काळाची नको असेल आपत्ती, तर वेळीच जपा जलसंपत्ती' या घोषवाक्यांतून शेतकरी आणि जलसंवर्धनाचा संदेश दिला जाणार आहे. महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे कोकणातील नामवंत दशावतार नाट्यमंडळांचे पाच पारंपरिक नाट्यप्रयोग. बाल्यानाचही महोत्सवात पाहायला मिळणार आहे.गेल्या महोत्सवांना ठाण्यापासून वेंगुर्ल्यापर्यंतच्या सुमारे दीड ते दोन लाख नागरिकांनी भेट दिल्याचा आयोजकांचा दावा आहे. यंदाही मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून कोकणातील उत्पादक शेतकरी आणि दशावतारी कलावंतांच्या विकासाला हातभार लावावा, असे आवाहन दिलीप बारटक्के आणि आयोजक संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मालवणी खाद्यसंस्कृतीचा खमंग आस्वाद

सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच कोकणच्या खाद्यसंस्कृतीची मेजवानीही नागरिकांना अनुभवता येणार आहे. अस्सल झणझणीत मालवणी मच्छी, मालवणी मसाला, उकडे तांदूळ, खडखडे लाडू, मालवणी खाजा, कुळथाची पिठी, सुकी मासळी, कोकम, काजू, आंबा-फणस वडी, पोहे आदी खाद्यपदार्थांचे स्टॉल असतील. याशिवाय भजनाची डबलबारी, कोकणरत्न पुरस्कार वितरण, गुणवंत विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, किल्ला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव तसेच मुलांसाठी फनफेअरचे आयोजन करण्यात आले आहे.